भूसंपादन मोबदला विलंबापोटीचा निर्णयाने शेतकऱ्यांचे नुकसान

बँकांसाठीच्या दरापेक्षा एक टक्के अधिक दराने व्याज मिळणार

मुंबई (प्रतिनिधी)– भूसंपादनाचा मोबदला विलंबाने दिल्या गेल्यास आता त्या रकमेवरील व्याज एकाच दराने दिले जाईल. हा व्याज दर बँकांसाठीच्या व्याज दरापेक्षा (रेपो रेट) फक्त एक टक्क्यांनी अधिक असेल, सा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाचा मोठा आर्थिक फटका विविध पायाभूत सुविधांसाठी आपली जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना बसणार आहे.

राज्य सरकारने विविध सार्वजनिक, शासकीय, निमशासकीय प्रकल्पांसाठी भूसंपादन करण्यासाठी उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ स्वीकारला आहे. या कायद्यातील तरतुदीनुसार होणाऱ्या भूसंपादनामुळे जमीन मालकांना चांगला मोबदला, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना होत असल्याने विरोधाचे प्रमाण खूप कमी झाले आहे. या अधिनियमात जमीन मालकांना भूसंपादनाचा मोबदला देण्यास विलंब झाल्यास कलम ३०(३) अनुसार १२ टक्के आणि कलम ७२ तसेच कलम ८० नुसार ९ टक्के आणि १५ टक्के व्याज देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर बोजा पडून प्रकल्पांच्या मूळ खर्चात वाढ होत असे.

मूळ प्रकल्प खर्चातील वाढ रोखण्यासाठी आता या व्याजदरात बदल करुन भूसंपादनाचा मोबदला देण्यास विलंब झाल्यास त्या रकमेवर सरसकट एकाच दराने व्याज देण्यात येईल. हा दर बँकासाठीच्या व्याज दराहून एक टक्के अधिक असेल. थकीत मोबदल्यावर या दराने दरसाल दर शेकडा प्रमाणे व्याज आकारण्याची तरतूद करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. याबाबत विधेयक विधिमंडळात मांडण्यात आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

शेतकऱ्यांना आमिष दाखविणारे रॅकेट कार्यरत

केंद्र सरकारच्या २०१३ च्या कायद्यानुसार भूसंपादन प्रक्रिया पार पडून निवाडा झाल्यानंतर पहिल्या वर्षात ९ टक्के व्याज देण्याची तरतूद आहे. तर विलंब झाल्यास दुसऱ्या वर्षी १५ टक्के व्याज देण्याचे कायद्यात नमूद केले आहे. मात्र, राज्यात शेतकऱ्यांना भूसंपादन मोबदल्याच्या व्याजापोटी अधिक रक्कम मिळवून देण्याचे आमिष देणारे रॅकेट कार्यरत आहेत. हे रॅकेट वकिलांच्या मदतीने न्यायालयात जातात.

अजित पवार, राम शिंदे आणि विखे पाटील एकाच व्यासपीठावर दिसणार

पुणे (प्रतिनिधी)– येत्या १७ एप्रिल रोजी 'शिव-फुले-आंबेडकर' संयुक्त जयंती महोत्सवाच्या निमित्ताने अजित पवार कर्जत-जामखेडमध्ये येणार आहेत. विशेष म्हणजे या कार्यक्रमात अजित पवार, राम शिंदे आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील हे एकाच व्यासपीठावर दिसणार आहेत. रोहित पवार आमदार असणाऱ्या मतदारसंघात हे दिग्गज नेते एकत्र येणार असल्याने कार्यक्रमाला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

विधानसभा निवडणुकीत महायुतीकडून प्रत्येक जागेसाठी मोठा प्रचार केला जात असताना, कर्जत-जामखेडमधील भाजप उमेदवार राम शिंदे यांच्या प्रचारात उपमुख्यमंत्री अजित पवार सहभागी झाले नव्हते. ते प्रचारासाठी फिरकलेही नाहीत. त्यामुळे निकालानंतर राम शिंदेंनी अजित पवारांवर टीका करत, त्यांना जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप केला होता. राम शिंदे हे आता विधान परिषदेचे सभापती झाले असून बरेच पाणी पुलाखालून वाहून गेले आहे. ही सर्व राजकीय पार्श्वभूमी असतानाच येत्या १७ एप्रिल रोजी शिव-फुले-आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सवाच्या निमित्ताने अजित पवार कर्जत-जामखेडमध्ये येणार आहेत.

हा महोत्सव राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवती आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष संध्या सोनवणे यांच्या पुढाकाराने आयोजित केला गेला आहे. या तीन दिग्गजांना एकत्र आणून आपल्या राजकीय ताकदीचे दर्शन घडवण्याचा प्रयत्न सोनवणे यांनी केला आहे. निवडणुकीत आपण कर्जत जामखेड मध्ये सभा घेतली असती, तर निकाल वेगळा लागला असता, अशी मिश्किल टिप्पणी अजितदादांनी थेट रोहित पवारांच्या पुढे केली होती. या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम अधिकच गाजण्याची शक्यता आहे. या महोत्सवात कोण काय बोलणार, कोणाला टोले मारणार, याकडे राजकीय वर्तुळांचे लक्ष लागले आहे. हा कार्यक्रम केवळ सांस्कृतिक न राहता, राजकीय रंगही घेणार, हे स्पष्ट आहे. त्यामुळे संध्या सोनवणेंची ही खेळी नेमकी कोणावर भारी पडते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांच्या गर्दीचे व्यवस्थापनासाठी पूर्वतयारी करा

जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांच्या सूचना

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील धार्मिकस्थळांना मोठ्या प्रमाणात भाविक भेट देण्याची शक्यता लक्षात घेता गर्दीचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी आतापासून नियोजन करावे आणि पर्यटकांसाठी सुविधा निर्माण करण्यावर भर द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी आयोजित पूर्वतयारी बैठकीत ते बोलत होते. बैठकीला अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, उत्तर प्रदेशात कुंभनिमित्ताने धार्मिक पर्यटनात वाढ झाली आहे. त्यामुळे नाशिक सोबत अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर येथील धार्मिक पर्यटनाला चालना देण्याचे शासनाचे प्रयत्न आहेत. त्यादृष्टीने धार्मिकस्थळांना जोडणारी वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी रेल्वेस्थानक, रस्ते, विमानतळ सुविधांच्या सुधारणेवर भर द्यावा. पर्यटकांच्या गर्दीचे नियोजन करण्यासाठी आवश्यक सुविधांची निर्मिती करावी. आरोग्य सुविधा, सुरक्षा विषयक उपाययोजना, स्वच्छतागृह, प्रमुख रस्ते, परिसर सुशोभीकरण, पोलीस मदत केंद्रे आदी व्यवस्थेचे आतापासून नियोजन करावे. शिर्डी आणि शनीशिंगणापूर परिसरातील रस्त्यांना लागून वाहनतळ तयार करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने जागा निश्चित कराव्या. शिर्डी येथे वाहतूकीला आतापासून शिस्त लागेल अशा उपाययोजना कराव्यात. मेळा कालावधीसाठी आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करावा. येणाऱ्या पर्यटकांना माहिती देण्यासाठी,आवश्य कतेनुसार मदत करण्यासाठी सर्व विभागाचे अधिकारी एका ठिकाणी असतील अशाप्रकारे मदत केंद्र उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करावा. प्रमुख धार्मिक स्थळांच्या मार्गावर सूचना फलक लावण्यात यावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. मुख्याधिकारी सतीश दिघे यांनी सादरणीकरणाद्वारे सिंहस्थाच्या अनुषंगाने आवश्यक पूर्वतयारीची माहिती दिली.

खेळण्यातील बंदुकीचा धाक दाखवून ज्वेलर्सवर दरोडा; २५ तोळे सोने लुटले

पुणे (प्रतिनिधी)– पुण्यातील सिंहगड रस्त्यावरील वडगाव धायरी भागात असलेल्या श्री ज्वेलर्सवर तीन दरोडेखोरांनी मंगळवारी संध्याकाळी दरोडा टाकल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. विष्णू दहीवाळ यांच्या मालकीचे हे दुकान असून दरोडोखोरांनी त्यांच्याकडील पिस्तुलाचा धाक दाखवून दुकानातील २० ते २५ तोळे सोने लुटुन नेल्याचा प्रकार घडला आहे. विशेष म्हणजे, दरोडेखोरांनी चोरीसाठी वापरलेले पिस्तुल हे खेळण्यातील असल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे. दरम्यान, पळून गेलेल्या तिघांचा पोलीस शोध घेत आहेत.

सिंहगड परिसरातील धायरी येथील मंगळवारी (ता.१५) दुपारी तीनच्या सुमारास सिंहगड परिसरातील धायरी येथील श्री ज्वेलर्स या सराफाच्या दुकानात तीन दरोडेखोर ग्राहक असल्याचा भासवत दुकानांत घुसले त्यानंतर त्यातील एकाने बंदुकीचा धाक दाखवत सराफाकडून सोन्याची मागणी केली. विरोध केला असता सराफाला आणि त्याच्या कामगारांना त्या दरोडेखोरांनी मारहाण केली. त्यानंतर सोन्याची लूट करत टू व्हीलरच्या साह्याने या दरोडेखोरांनी पळ काढला. याबाबत पुणे पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, काळुबाई चौक, रायकर मळा, धायरी येथील श्री सराफ दुकानात दुकान मालक विष्णू सखाराम दहिवाल आणि कामगार दुकानात असताना एक व्यक्ती दुकानात आला . सोन्याची चैन दाखवा , असे सांगून मालक सोन्याची चैन दाखवत असताना आणखी दोन अनोळखी व्यक्ती एकापाठोपाठ दुकानात शिरले. त्यांनी पिस्तुल दाखवून आणि धमकी देऊन शिवीगाळी करत अंदाजे २० ते २५ तोळे सोन्याचे वेगवेगळे दागिने हिसकावले. दरम्यान, दुकान मालकाने विरोध करण्याचा प्रयत्न केला असता त्यांना हाताने मारहाण करून, पिस्टलच्या बटने मारहाण करून दुचाकीवरून फरार झाले आहेत.

पटेलवाडी येथे आंबेडकर जयंती उत्साहात

श्रीरामपूर (प्रतिनिधी)– तालुक्यातील उक्कलगाव अंतर्गत येणाऱ्या पडेलवाडी येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने भन्ते श्रीमती पंडित यांच्या वाणीतून धम्म वंदना देण्यात आली.

सकाळी लोकनियुक्त सरपंच रवीना शिंदे व सोसायटीचे संचालक शरद थोरात यांच्या हस्ते विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व भगवान गौतम बुध्द यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन धम्म वंदना घेण्यात आली. तसेच सायंकाळी जि.प.चे माजी सभापती बाबासाहेब दिघे, दत्तनगरचे प्रेमचंद कुंकूलोळ, प्रकाश थोरात, राजेंद्र थोरात, दीपक थोरात, नितीन कर्डिले यांनी उपस्थित राहून डॉ.बाबासाहेब आंबेडकर व भगवान गौतम बुध्द यांना अभिवादन केले.

यावेळी उपस्थित सर्व जनसमुदायाला सुरुची भोजन देण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नानासाहेब निकम व मित्रमंडळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

वर्षातून दोनदा प्रवेश प्रक्रिया सुरू

पुणे(प्रतिनिधी)– देशातील विद्यापीठांमध्ये आता वर्षातून दोनदा प्रवेश होतील. विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. अधिसूचनेनुसार आता इग्रूसारखे कोणतेही विद्यापीठ जुलै-ऑगस्ट आणि जानेवारी-फेब्रुवारीमध्ये वर्षातून दोनदा प्रवेश प्रक्रिया सुरू करू शकते.विद्यापीठे त्यांच्या पायाभूत सुविधा, प्राध्यापक आणि समर्थन प्रणालीनुसार वर्षातून दोनदा प्रवेश घेऊ शकतात आणि त्यासाठी नियम लागू करू शकतात, असे यूजीसीने अधिसूचनेत स्पष्ट केले आहे.

यूजीसीच्या अधिसूचनेनुसार, विद्यार्थी आता कमी वेळेत त्यांची पदवी पूर्ण करू शकतात आणि विस्तारित पदवी कार्यक्रम देखील घेऊ शकतात. या निर्णयामुळे त्वरित किंवा विस्तारित पदवी कार्यक्रमाद्वारे पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा नियम लागू झाला आहे.

आता विद्यार्थ्यांसमोर तीन पर्याय असतील. पहिला पर्याय म्हणजे ठरावीक कालावधीत पदवी मिळवणे. दुसरा पर्याय म्हणजे निर्धारित कालावधीपेक्षा जास्त वेळात पदवी मिळवणे हा आहे. विद्यार्थी पहिले किंवा दुसरे सत्र पूर्ण केल्यानंतर अक्सलिरेटेड डिग्री प्रोग्राम निवडून पदवी पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले पेडिटस- मिळवू शकतील. तीन वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमात एकूण सहा सेमिस्टर असतील. विद्यार्थी पाच सत्रांमध्ये पदवी पूर्ण करू शकतील. पदवीच्या चार वर्षांत आठ सेमिस्टर असतील. विद्यार्थी सहाव्या किंवा सातव्या सत्रात हा अभ्यासक्रम पूर्ण करू शकतील.

कमी वेळेत पदवीसाठी १० टक्के अर्ज स्वीकारणार

प्राप्त झालेल्या अर्जांपैकी १० टक्के अर्ज कमी वेळेत पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी निवडले जातील. विस्तारित पदवी कार्यक्रमांतर्गत, विद्यार्थी अधिक वेळेत पदवी अभ्यासक्रम पूर्ण करू शकतात. ते दोन सेमिस्टरपर्यंत वाढवू शकतात.

तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम चार वर्षांपर्यंत वाढवता येतो आणि चार वर्षांचा अभ्यासक्रम पाच वर्षांपर्यंत वाढवता येतो. जेव्हा तुम्हाला पदवी मिळेल तेव्हा त्यावर विद्यार्थ्याने पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी किती वेळ घेतला, हे लिहिलेले असेल असे देखील स्पष्ट केले आहे.

८ लाख लाडक्या बहिणींना ५०० रुपयांचा हफ्ता मिळणार

मुंबई– मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी ठरलेल्या राज्यातील तब्बल ८ लाख महिलांना आता १५०० रुपयांऐवजी दर महिन्याला केवळ ५०० रुपयांचा हफ्ता मिळणार असल्याची माहिती मिळत आहे. या ८ लाख महिलांना नमो शेतकरी महासन्मान निधी मिळत असल्याने त्यांना आता १५०० रुपयांऐवजी केवळ ५०० रुपयांची आर्थिक मदत मिळणार आहे. राज्य सरकारकडून करण्यात आलेल्या छाननीत ८ लाख लाडक्या बहिणींना नमो शेतकरी महासन्मान निधीची मदत मिळत असल्याचं समोर आलं.

पान १ वरुन

पालिका, झेडपी निवडणुका दिवाळीनंतर

देण्यात आली. या सुधारणेनुसार नगराध्यक्षांना पदावरून दूर अधिकार निवडून आलेल्या नगरसेवकांना असणार आहेत. निवडून आलेल्या नगरसेवकांच्या संख्येपैकी दोन तृतीयांश संख्येने नगरसेवकांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना पाठवता येईल. या प्रस्तावावर जिल्हाधिकाऱ्यांना १० दिवसांच्या आता विशेष सभा आयोजित करून मतदानाद्वारे निर्णय घ्यावा लागेल. अधिनियमातील सुधारणाविषयक विधेयक राज्य विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनात मांडण्यात येणार आहे.

यापूर्वी नगराध्यक्षांना पदावरुन बाजूला सारण्याचा प्रक्रियेत निवडून आलेल्या नगरसेवकांपैकी ५० टक्के नगरसेवकांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला जात असे. त्यानंतर राज्य सरकारच्या स्तरावर कार्यवाही करून नगराध्यक्षांना पदावरून दूर करण्याची कारवाई केली जात होती. आता राज्य सरकारने आपले अधिकार सध्या अस्तित्वात असलेल्या १०५ नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरीच्या लोकनियुक्त नगरसेवकांना दिले आहेत. या १०५ स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत येत्या दोन वर्षात संपत आहे.

महाराष्ट्रात यंदाही धो-धो पाऊस

सुमारे १०५ टक्के पडेल. तर महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्यात मुसळधार (अबोव्ह नॉरमल) म्हणजे सुमारे १०५ ते ११५ टक्के इतका जास्त पडेल. त्यातही मराठवाड्यात यंदा त्याहीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज आहे. संपूर्ण नकाशात देशभरात निळा रंग दाखवलेला आहे. तर महाराष्ट्र आणि छत्तीसगड ही दोन राज्ये गडद निळ्या रंगात दाखवली आहेत.

पाऊस चांगला पण..

यासोबतच महापात्रा यांनी काही गोष्टींचा इशारा देखील दिला आहे. देशातील काही भागात सध्या प्रचंड उन्हाळा आहे. एप्रिल ते जून दरम्यान अनेक राज्यांमध्ये उष्णतेच्या लाटेची शक्यता आहे. यामुळे काही भागात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होऊ शकते. तसेच वीजेची मागणी वाढण्याची शक्यता आहे. यामुळे पिण्याच्या पाण्याचे देखील संकट भेडसावू शकते.

स्कायमेटचा देखील दमदार पावसाचा अंदाज

भारतातील हवामान विषयक अंदाज वर्तवणाऱ्या स्कायमेटने यंदाच्या मान्सूनचा अंदाज जाहीर केला आहे. स्कायमेटने मान्सूनचा हा हंगाम सामान्य राहील, असा अंदाज वर्तवला आहे. जून ते सप्टेंबर या कालावधीत सरासरीच्या १०३ टक्के पाऊस होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यात ५ टक्क्यांची वाढ किंवा घट होऊ शकते. जून ते सप्टेंबर या कालावधीत सरासरी ८६८.६ एमएम पाऊस पडेल, असा अंदाज आहे.

मालमत्ता कर दंड माफ

नियमावलीच्या धर्तीवर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी (स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण) (सुधारणा) नियम २०२५ निश्चित करण्यात येणार आहेत.

नगरपरिषद, नगरपंचायत, औद्योगिक नगरी यांच्या मालमत्तांचे निवासी, शैक्षणिक, धर्मादाय, सार्वजनिक, व्यावसायिक आणि औद्योगिक असे वर्गीकरण करण्यात आले आहे. आता सुधारित नियमानुसार निवासी, शैक्षणिक, धर्मादाय आणि सार्वजनिक वापरासाठीच्या मालमत्तांचा भाडेपट्टा दर हा वर्तमान बाजारमूल्याच्या (रेडी रेकनर) ०.५ टक्के पेक्षा कमी असणार नाही. तसेच व्यावसायिक आणि औद्योगिक वापरासाठीच्या मालमत्तेचा बाजारमूल्याच्या ०.७ टक्के पेक्षा कमी असणार अशी तरतूद करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या मालमत्तांचे अधिमूल्य, भाडेपट्टादर आणि सुरक्षा ठेव निश्चिती ही संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय समिती करेल. सदर नियमांबाबत हरकती आणि सूचना मागविण्यात येतील. त्यानंतर अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल.

सोनिया गांधी आणि राहुल गांधी विरोधात ईडीची चार्जशीट दाखल

ईडीचे म्हणणे आहे की, ही कारवाई मनी लॉन्ड्रिंग कायद्याअंतर्गत केली जात आहे. नॅशनल हेराल्ड हे एजेएलद्वारे प्रकाशित केले जाते. ही कंपनी यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेडच्या मालकीची आहे. सोनिया गांधी आणि राहुल गांधी दोघांचाही या कंपनीत ३८ टक्के भागिदारी आहे. यामुळे ते कंपनीचे सर्वात मोठे भागधारक आहेत.

ईडीने असेही नमूद केले की, ही कारवाई एजेएल मनी लॉन्ड्रिंग प्रकरणाच्या चौकशीचा एक भाग आहे. मनी लॉंड्रिंग प्रतिबंधक कायदा (पीएमएलए), २००२च्या कलम ८ अंतर्गत ही चौकशी सुरू आहे. शिवाय, मनी लॉंडरिंग (जप्त किंवा गोठवलेल्या मालमत्तेचा ताबा) नियम, २०१३ च्या संबंधित तरतुदीनुसार कारवाई करण्यात येत आहे. सदर आरोपपत्र एप्रिलमध्ये सादर करण्यात आले असून विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी या प्रकरणाची दखल घेतली आहे. तर २५ एप्रिलला याप्रकरणी सुनावणी होणार आहे.

दरम्यान, सोनिया गांधी आणि राहुल गांधींसह सॅम पित्रोदा आणि सुमन दुबे यांचेही नाव दोषारोपपत्रात जोडण्यात आले आहे. तर काँग्रेसकडून या कारवाईला मराज्य पुरस्कृत गुन्हाफ असे म्हणत जोरदार विरोध करण्यात आला आहे. नेते जयराम रमेश यांनी यासंदर्भात ट्विट केले आहे.

श्रीरामपुरात काँग्रेसला मोठे खिंडार

सोमनाथ गांगड, संजय गांगड, विजय शेळके, दिगंबर फरगडे, सुनील क्षीरसागर, विराज भोसले, ॲड. युवराज फंड, व्यापारी संघटनेचे माजी अध्यक्ष वैभव लोढा, सचिव दत्तात्रय ढालपे, उपाध्यक्ष निलेश बोरावके, पराग शहा, राकेश न्याती, संदीप अग्रवाल, चेतन भुतडा, योगेश डंबीर, चिरायू नगरकर, सिद्धार्थ फंड, अमोल शेटे, सुयोग गायकवाड, नारायण छल्लारे, अमोल बोंबले, राजेंद्र वाघमारे, राजेंद्र बोरसे, योगेश शहाणे, कल्पेश माने, विशाल फोफळे, सागर भागवत, धिरज तलवार, बाबा गांगड यांच्यासह १०० हून अधिक जणांनी मुंबईतील भाजपच्या पक्ष कार्यालयात पक्ष प्रवेश केला.

यावेळी ना. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, काँग्रेसमधील पदाधिकाऱ्यांसह व्यापारी, उद्योजकांनी श्रीरामपूरच्या विकासासाठी भाजपवर विश्वास ठेवला. यापुढील काळात श्रीरामपूर शहराचा विकास अजून जोमाने करू, असे आश्वासन ना. विखे पाटील यांनी दिले.

पक्षात प्रवेश दिल्याबद्दल बिहाणी यांनी आभार मानून श्रीरामपूरच्या विकासासाठी काँग्रेसला सोडून भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला असल्याचे सांगतिले.

आगामी काळात जिल्ह्यात भाजपाची ताकद अधिक वाढविण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी जोरदार बॅटींग सुरु केली आहे. काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या श्रीरामपूर शहरातील काँग्रेसचा मोठा गट फोडण्यात विखे यांना यश आले आहे. या प्रवेशामुळे काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या श्रीरामपूरमध्ये काँग्रेसला मोठे खिंडार पडले आहे.

▸ पालकमंत्री विखे यांच्याकडे विकासाचे व्हिजन आहे. त्यांनी श्रीरामपूरात अनेक विकास कामे केली. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा या दोन्ही पुतळ्यांचे कामे त्यांनी मार्गी लावली. माजी आ. स्व.जयंतराव ससाणे यांचे श्रीरामपूरला मुबलक पाणी उपलब्ध करण्याचे स्वप्न होते. आता नव्या साठवण तलावासाठी ना. विखे पाटील यांनी १७५ कोटी रूपये दिले असून त्याचे काम सुरू आहे. अतिक्रमण हटविण्यात आल्यानंतर ना. विखे यांची भेट घेतली असता त्यांनी पुनर्वसनाचा शब्द दिलेला आहे. गोरगरीबांसाठी चार हजार घरकुले बांधण्यात येणार आहेत. श्रीरामपूरच्या सर्वांगिण विकासासाठी सर्वांनी हा निर्णय घेतला आहे.

– संजय फंड, माजी नगराध्यक्ष

मार्चअखेर जिल्हा बँकेची अवघी ४० टक्के वसुली!

रुपयांची थकबाकी असल्याची माहिती जिल्हा बँकेच्या वतीने देण्यात आली. बँकेची झालेली वसुली अवघी ४० टक्के असल्याने त्याचा पुढील कर्ज वाटपावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. दरम्यान राज्यातील महायुती सरकारकडून कर्जमाफी मिळेल या आशेवर शेतकरी होते. यामुळे त्यांनी मार्चअखेर थकीत कर्जाची रकमा भरल्या नाहीत. अन्य बँकांचे आर्थिक वर्ष ३१ मार्च असले तरी जिल्हा बँकेचे दरवर्षी ३० जूनला नवे-जुने करण्यात येते. दरम्यान, मार्चअखेर बँकेची ४० टक्के वसुली असली तरी ती ३० जूनअखेर वाढणार नसल्याचा अंदाज असून यामुळे यंदा जिल्हा बँकेची ५० टक्क्यांपेक्षा जास्त कर्ज वसुली रखडण्याची शक्यता आहे.

८२ सहकारी संस्थांची शंभर टक्के वसुली

जिल्हा बँके अंतर्गत येणाऱ्या गाव पातळीवरील सहकारी संस्थांपैकी अवघ्या ८२ संस्थांची मार्च अखेर १०० टक्के वसुली झाली असल्याचे जिल्हा बँकेचे वतीने सांगण्यात आले.

थकीत भरा अन् व्याजात सवलत मिळवा

शेतकऱ्यांनी मागील वर्षी घेतलेले कर्ज वेळेत भरल्यास बँकेच्या वतीने संबंधित शेतकऱ्यांना सरकारच्या शून्य टक्के व्याजदर योजनेचा फायदा देता येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी घेतलेल्या विविध कर्जाची वेळेत परतफेड करावी, असे आवाहन बँकेच्या वतीने करण्यात आली आहे.

रेशन दुकानदारांच्या कमिशनमध्ये वाढ

७ कोटी लाभार्थांना शिधावाटप दुकानांच्या माध्यमातून स्वस्त अन्नधान्याचे वितरण करण्यात येते. केंद्र सरकारच्या अखत्यारीतील भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामांपासून राज्याच्या शहरात, गावखेड्यातील शिधावाटप दुकानांपर्यंत अन्नधान्य पुरवण्यासाठी एक प्रभावी यंत्रणा कार्यरत आहे. ही यंत्रणा अधिक जलद, सक्षम, पारदर्शक, विश्वासार्ह बनविण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्याचा नागरी पुरवठा विभाग प्रयत्नशील आहे. त्यासाठी स्मार्ट रेशनकार्ड, इलेक्ट्रॉनिक वजनकाटे, जीपीएस ट्रॅकिंग, लाईव्ह मॉनिटरींगसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करुन महाराष्ट्रासाठी उपयुक्त ठरेल अशी खरेदी, वितरण, नियंत्रण, देखभाल यंत्रणा उभारण्याचा निर्णय आज बैठकीत घेण्यात आला. यासाठी सध्या गुजरातमध्ये उपयोगात असलेल्या यंत्रणेचाही अभ्यास करण्यात येणार आहे.

आंतरराष्ट्रीय कुस्ती पंच काबलियेवर तीन वर्षे बंदी

मारहाण केली. पंचाना झालेल्या मारहाणीबाबत राज्य कुस्तीगीर संघाकडुन राक्षेवर शिस्तभंगाची कारवाई करत ३ वर्षाची स्पर्धा सहभाग बंदी घालण्यात आली.

दरम्यान, काबलिय यांनी दिलेल्या चितपटीच्या निर्णयावरून महाराष्ट्रातील कुस्ती क्षेत्रामध्ये प्रचंड संभ्रमाचे वातावरण तयार झाले व उलट सुलट चर्चा होऊ लागल्या. याचे आवलोकन करून महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष विलास कथुरे यांच्या अध्यक्षतेखाली या कुस्तीच्या निर्णयाबाबत चौकशी समिती स्थापण केली होती. चौकशी समितीचे प्रमुख कथुरे यांनी चौकशी समितीचा अहवाल २८ फेब्रुवारी २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघास सादर केला. या अहवालामध्ये तुम्हला दोषी धरण्यात आले असल्याने तुमच्यावर महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाकडून ३ वर्षांसाठी राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा सहभागास बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. याबाबत आपले मत मांडायचे असल्यास पुढील ७ दिवसांमध्ये महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघास लेखी स्वरूपात मत मांडावे, असे राज्य कुस्तीगीर संघाने आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे.

महेंद्र गायकवाडची शिस्तभंग शिथील

दरम्यान सेमी फायनल किस्ती कुस्तीमध्ये पैलवान महेंद्र गायकवाड याने पंचाच्या निर्णयावर नाराजी व्यक्त करत कुस्ती अर्ध्यावर सोडून निघून जाणे पसंत केले होते. यामुळे त्यांच्यावर राज्य कुस्तीगीर संघाकडून शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली होती. मात्र, या कारवाईवर गायकवाड याच्यावतीने खुलासा करण्यात येवून हा प्रकार गैरसमजुतीतून घडला असून त्याबाबत दिलगीरी व्यक्त करण्यात आली. यामुळे राज्य कुस्तीगीर संघाकडून गायकवाड याच्या विरोधात ३ वर्षासाठी पुढील कुस्ती स्पर्धेत सहभागी न होण्याचे आदेशात शिथीलता देण्यात आले असल्याचे पत्र राज्य कुस्तीगीर संघटनेचे सरचिटणीस योगेश दोडके यांनी काढले आहे.